ePaper

‘नीति’ आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही संस्था उभारणार–देवेंद्र फडणवीस



| वर्ष - 6 । अंक - 160 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मोदींना शुभेच्छा अन् आत्महत्या!
- कत्तलीसाठी जनावरांची चोरी
- क्षमा करण्यासाठी मोठं मन हवं- एकनाथ शिंदे


www.mahaenews.com | । सोमवार । दिनांक 19 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



अरे गद्दार कोण? आदित्य तू गद्दार आहेस, मला संपवण्यासाठी कारस्थान रचलेस, असा एकेरी उल्लेख करत रामदास कदम यांनी माजी मंत्री आदित्य ठाकरेंवर आरोप केला. मंत्रालयात अडीच वर्षात गेलात सगळ्यांवर अन्याय केलात. उद्धव ठाकरे तुम्ही महाराष्ट्राच्या जनतेशी गद्दारी केलीत.

-रामदास कदम

माझे मित्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि नागपुरमधील माझ्या सर्व बंधु-भगिनींनो.. मी असं काही आजपर्यंत भारतात पाहिलेलं नाही. जे काही पाहीलं आहे ते भारताच्या बाहेरच पाहिलेलं आहे. नितीन गडकरी जे काही करतात ते भव्य दिव्यंच असतं. काही खाली करतच नाहीत, ते सगळं वरूनच असतं. कारंजाही वर जातो उड्डाणपूल देखील वर जातो. सगळं वरूनच करतात.

- राज ठाकरे, मनसे प्रमुख



# वृक्षतोडप्रकरण संगनमताने दडपले?

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील वृक्षतोड प्रकरणी दीड महिन्यानंतरही कारवाई नाहीच

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गालगतच उर्से गावच्या हद्दीत शेकडो झाडांची कत्तल करण्यात आल्याचे धक्कादायक प्रकरण संगनमताने दडपण्यात आल्याची शक्यता दिसून येत आहे. दीड महिन्यानंतरही या संदर्भात कोणतीच कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. मुंबईहून पुण्याकडे जाताना उर्से गावाच्या हद्दीत द्रुतगती मार्गाला खेटून असलेल्या जमिनीवरील मोठी झाडे कापून नेण्यात आली होती.



### प्रसारमाध्यमांमुळे विषय चव्हाट्यावर...

२५ ते २८ जुलैदरम्यान घडलेला हा प्रकार स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींमुळे उघड झाला. इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होऊनही शासकीय यंत्रणेला याबाबत काहीच माहिती कशी नव्हती, याचे तेव्हाही गूढ होते. प्रसारमाध्यमांनी हा विषय चव्हाट्यावर आणल्यानंतर बरीच खळबळ उडाली.

### शासकीय यंत्रणेकडून काहीच कारवाई नाही...

त्यानंतर या प्रकरणी अज्ञात २५ जणांच्या विरोधात शिरगाव परंदवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातील दोषींवर कारवाई होईल, असे वाटत होते. प्रत्यक्षात त्यानंतरही काहीच कारवाई झाली नाही. ही वृक्षतोड कोणी केली, याचे सूतोवाच पर्यावरणप्रेमींनी केले होते. तरीही शासकीय यंत्रणेकडून काहीच कारवाई झाली नसल्याचे दिसून आले. या संदर्भात तपास सुरूच आहे, असे उत्तर पोलिसांकडून देण्यात येत आहे.

# मुंबईपाठोपाठ पुण्यातही काँग्रेसचा स्वबळाचा नारा!

## काँग्रेसच्या सुकाणू समिती बैठकीत एकमताने निर्णय

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केल्यानंतर पुण्यातही काँग्रेस स्वतंत्र लढणार आहे. शहर काँग्रेसच्या सुकाणू समितीच्या बैठकीत स्वबळाचा नारा देत एकमताने तसा निर्णय घेण्यात आला. आघाडी करण्यापेक्षा स्वबळावर लढल्यास पक्षाच्या अधिक जागा निवडून येतील आणि काँग्रेस संपूर्ण शहरात पोहोचण्यास मदत होईल, असा दावा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी



केला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसविरोधातही बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आल्याने महाविकास आघाडी होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.शहर जिल्हा काँग्रेसच्या सुकाणू समितीची (कोअर कमिटी) बैठक काँग्रेस भवनात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

> आगामी महापालिका निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. निवडणुकीसाठी इच्छुकांनी आणि कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात प्रभागाची तसेच पक्ष संघटनेची बांधणी करण्यास सुरुवात करावी अशा सूचनाही देण्यात आली आहे. - अरविंद शिंदे, प्रभारी शहराध्यक्ष, काँग्रेस

या बैठकीत आगामी महापालिका निवडणुकीसंदर्भातील रणनीतीसंदर्भात चर्चा करण्यात आली. बैठकीत सर्व नेते, नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याची आग्रही मागणी केली. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी दिला. आघाडी करून निवडणुका लढविण्याने पक्षाचे नुकसान होईल, असे मत मांडले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणुकीत मदत होत नाही, अनेकदा काँग्रेसच्या विरोधातही काम केले जाते. त्यामुळे आघाडीचा फायदा काँग्रेसला होत नाही, अशी तक्रार या बैठकीत करण्यात आली. यापूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते पुण्यातील काँग्रेसच्या उमेदवाराच्या प्रचारात नव्हते, तर बारामती आणि शिरूर लोकसभा मतदारसंघांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारात सहभागी झाले होते,

### महाविकास आघाडीत बिघाडी

मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्यात येईल, असे नाना पटोले यांनी यापूर्वीच जाहीर केले आहे. त्यापाठोपाठ पुण्यातही स्वबळाचा नारा देण्यात आला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघाडी होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे काँग्रेसच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यपद्धतीबाबतही नाराजी व्यक्त करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर कार्यकारिणीच्या बैठकीत काही महिन्यांपूर्वी स्वबळावर निवडणूक लढविण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. त्याच सन्मानाने आणि योग्य पद्धतीने जागा वाटप झाले तरच आघाडी करू अशी भूमिका शिवसेनने जाहीर केली आहे. त्यामुळे आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे.

## शॉर्ट न्यूज

### अखंड पावसाने पिकांवर संकट

।पुणे। महाईन्यूज ।

मोसमी पाऊस सक्रिय झाल्यानंतर एका टप्प्यावर 'ब्रेक मान्सून' (सलग १० ते १५ दिवस पावसाचा खंड) ही वातावरणीय प्रणाली निर्माण होत असते, मात्र यंदा राज्यात कोणत्याही भागांत अशा प्रकारे पावसाने दीर्घ सुटी घेतली नाही. पावसाने आवश्यक असलेला खंड न दिल्याने त्याचा पिकांच्या पोषणावर काहीसा परिणाम होऊ शकतो, असे अभ्यासकांचे मत आहे. यंदा कमी दाबाच्या पट्ट्यांनी बदललेली दिशा आणि त्यातून पावसाच्या बदललेल्या स्वरूपामुळे राज्यातील धरणांत मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा जमा झाला आहे, मात्र पावसाने आवश्यक असलेली उघडीप दिलेली नाही. राज्यात जूनमध्ये पावसाचे प्रमाण कमी होते, मात्र जुलै, ऑगस्टमध्ये सर्वाधिक पाऊस झाला आणि आता सप्टेंबरच्या मध्यानंतरही बहुतांश भागात पाऊस सक्रिय आहे. या पावसामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा धरणे लवकर भरली आहेत. सध्या धरणांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा आहे. अनेक धरणांतून विसर्ग करण्यात येत आहे. सरासरीच्या तुलनेत राज्यात सद्य:स्थितीत २६ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे.

# मोदींना शुभेच्छा अन् आत्महत्या!

## पुणे जिल्ह्यातील जुन्नरमध्ये धक्कादायक घटना

।पुणे। महाईन्यूज ।





जुन्नर : 'पिकाला हमी भाव नाही, देणेकरी मागे लागले आहेत, तुमच्या नाकर्तेपणामुळे मी आत्महत्या करत आहे,' असे शुभेच्छापत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाला लिहून जुन्नर तालुक्यातील एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली. जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंदजवळ रानमळा परिसरात शेतकऱ्याने शेततळ्यात उडी मारून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी शेतकऱ्याने पंतप्रधानांना वाढदिवसाचे शुभेच्छा देणारे पत्र लिहून व्यथा मांडल्याने जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

दशरथ लक्ष्मण केदारी (वय ४२) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी आत्महत्या केल्याप्रकरणी आळेफाटा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.केदारी यांनी आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठी लिहिली आहे.

या चिठ्ठीतून केदारी यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या आहेत. पंतप्रधानांना वाढदिवसाच्या दिवशी दिलेले शुभेच्छापत्र असल्याचे केदारी यांनी चिठ्ठीत नमूद केले आहे, असे केदारी यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. पोलिसांनी केदारी यांनी लिहिलेली चिठ्ठी जप्त केली आहे. त्या दृष्टीने तपास करण्यात येत असल्याचे आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांना पतपेढीवाले दमबाजी करतात

'मी, दशरथ लक्ष्मण केदारी जीवनास कंटाळालो आहे. राज्य सरकार कांद्याला योग्य भाव देत नाही. टोमॅटोला भाव मिळत नाहीत. करोना संसर्गामुळे झालेले नुकसान; तसेच अतिवृष्टीचा फटका शेतीमालाला बसला आहे. हातात पैसे नाहीत. देणेकरी थांबायला तयार नाहीत. आम्ही काय करायचे सांगा? कांदा बाजारात नेण्यास देखील परवडत नाही. तुम्हाला तुमचे पडले आहे मोदी साहेब. आम्ही भीक मागत नाही. आम्ही हक्काचे मागत आहोत. तुम्ही शेतकऱ्यांना हमी भाव दिला पाहिजे. शेतकऱ्यांना पतपेढीवाले दमबाजी करतात. शेतकऱ्यांसारखा जुगार कोणी खेळत नाही. आम्ही दाद कोणाकडे मागायची सांगा,' असे केदारी यांनी चिठ्ठीत नमूद केले आहे.'मी आत्महत्या करत आहे. आम्हाला आमच्या हक्काचा बाजारभाव द्या, ही विनंती. तुम्हाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा मोदी साहेब,' असे केदारी यांनी चिठ्ठीत म्हटले आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सोमवारी जनसंवाद सभा




।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सोमवारी सकाळी 10 ते 12 या वेळेत जनसंवाद सभा होणार आहे. नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणा-या विकासकामांमध्ये नागरिकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब उमटावे यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय दर सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत असते. या सभेकरीता महानगरपालिकेच्या 8 क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालय निहाय मुख्य समन्वय अधिक-यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये उपआयुक्त तथा प्र. कायदा सल्लागार चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पर्यावरण विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, स्थापत्य उद्यान विभागाचे सहशहर अभियंता सतीश इंगळे, पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, शहर अभियंता मकरंद निकम, भूमी आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत जोशी, आरोग्य विभागाचे उपआयुक्त अजय चारठाणकर यांची अनुक्रमे अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे मुख्य समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय ते या जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान भूषवत आहेत.

# भेंडी, गवार महाग ; पितृपंधरवड्यामुळे फळभाज्यांना मागणी

## श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात राज्य तसेच परराज्यांतून 80 ते 90 ट्रक फळभाज्यांची आवक

।पुणे । महाईन्यूज



पितृपंधरवड्यामुळे फळभाज्यांच्या मागणीत वाढ झाली आहे. भेंडी, गवार या फळभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.गुलटेकडी येथील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात रविवारी (१८ सप्टेंबर) राज्य; तसेच परराज्यांतून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ५ ते ६ ट्रक हिरवी मिरची, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूतून १ टेम्पो शेवगा, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, गुजरातमधून ३ टेम्पो कोबी, इंदूरहून ७ ते ८ टेम्पो गाजर, मध्यप्रदेश आणि गुजरातमधून मिळून १० ते १२ ट्रक लसूण, गुजरातमधून २ टेम्पो भुईमूग शेंग, आग्रा, इंदूरमधून मिळून ४० ते ४२ ट्रक बटाटा अशी आवक परराज्यांतून झाली, अशी माहिती घाऊक बाजारातील प्रमुख अडते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, टोमॅटो ७ ते ८ हजार पेटी, तांबडा भोपळा ८ ते १० टेम्पो, भुईमूग शेंग ५० ते ६० गोणी, मटार ४०० गोणी, कांदा ५० ट्रक अशी आवक बाजारात झाली.

### फुलांच्या मागणीत घट

पितृपंधरवड्यामुळे फुलांच्या मागणीत घट झाली आहे. पावसामुळे फुले भिजली आहेत. चांगल्या प्रतीच्या फुलांना दर मिळाले आहेत. बाजारात आवक झालेल्या फुलांपैकी ६० ते ७० फुले पावसामुळे खराब झाली आहेत, अशी माहिती फूल बाजारातील व्यापारी सागर भोसले यांनी दिली.

### पालेभाज्या तेजीत

पालेभाज्यांची आवक स्थिर असून दर तेजीत आहेत. पावसामुळे पालेभाज्यांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. रविवारी मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबिरीच्या सव्वालाख जुडी; तसेच मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली.

### डाळिंब, खरबूज, कलिंगड, पपईच्या दरात वाढ

आवक कमी झाल्याने डाळिंब, खरबूज, कलिंगड, पपईच्या दरात वाढ झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. सीताफळ, लिंबांच्या दरात घट झाली आहे. चिकू, अननस, पेरू, संत्री, मोसंबीचे दर स्थिर आहेत. फळबाजारात लिंबू एक हजार ते १२०० गोणी, डाळिंब २५ ते ३० टन, पपई ४ ते ५ टेम्पो, कलिंगड ३ ते ४ टेम्पो, खरबूज १ ते २ टेम्पो, सीताफळ २० ते ३० टन, संत्री १० ते १२ टन, मोसंबी ७० ते ८० टन अशी आवक फळबाजारात झाली.

# कत्तलीसाठी जनावरांची चोरी!

## गुंगीचे औषध दिल्याने बैलाचा दुर्दैवी मृत्यू; गोरक्षकांचे मृत बैलासमवेत महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन





**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गुंगीचे औषध देऊन मोकाट जनावरांना कत्तलीसाठी गाडीमध्ये घालून त्यांची चोरी करण्याचा अत्यंत संतापजनक प्रकार पिंपरी येथील सुदर्शन चौक येथे शनिवारी (दि.17) उघडकीस आला आहे. चोरी करणाऱ्या समाजकंटकांनी अगदी तीन ते चार वर्षाच्या बैलाला देखील भूल दिली. त्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. याला जबाबदार असणाऱ्या प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी आता गोरक्षकांकडून करण्यात येत आहे.**

पिंपरी येथे तीन ते चार मोकाट जनावरांना कत्तलीच्या उद्देशाने भुलीचे इंजेक्शन देऊन स्विफ्ट डिझायर गाडीमध्ये गाय व वासराला पळवून नेण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची माहिती गोरक्षक प्रदिप खराडे, गणेश मंजाळ व अक्षय खंडागळे यांना मिळाली. गोरक्षक घटनास्थळी पोहचले. यावेळी वासराची परिस्थिती गंभीर होती. याबाबतीत पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे तसेच मानद पशु कल्याण अधिकारी अभिजीत चव्हाण यांच्यासोबत गोरक्षक प्रदीप खराडे, गणेश मंजाळ व अक्षय खंडागळे यांनी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे यांच्या मार्फत कोणतेही ठोस पाऊल उचलले न गेल्यामुळे बैलाचा दुर्दैवी मृत्यू झाला असे अभिजीत चव्हाण यांनी सांगितले. या संतापजनक व दुखःद घटनेनंतर पिंपरीतील (PIMPRI CRIME) गोरक्षकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झालेली असून पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच गोरक्षकांनी पालिकेच्या गेटसमोर मृत बैलाला ठेऊन आंदोलन केले. या आंदोलनामध्ये विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री अभिजीत शिंदे, मानद पशु कल्याण अधिकारी अभिजीत चव्हाण, अमित कुदळे, गणेश मंजाळ, प्रतीक खराडे, दीपक मुंगसे, नितीन कुदळे, विठ्ठल जाधव, मंगेश नढे, ऋषी ढाकणे, महेश आढाव हे गोरक्षक उपस्थित होते.

### चोरी करणारी टोळी शहरात सक्रीय?

याआधीही 12 सप्टेंबर रोजी भोसरी गावामध्ये मध्यरात्री गायीला गुंगीचे औषध देऊन चोरून नेण्याचा प्रयत्न केला होता. यावरून पोलिसांनी चार अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला होता. मात्र, सलग घडणाऱ्या घटनांवरून एखादी टोळी सक्रीय असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### मृत बैलासमवेत महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर गोरक्षकांचे आंदोलन

पिंपरी येथे मोकाट जनावरांना कत्तलीच्या उद्देशाने भुलीचे इंजेक्शन देऊन स्विफ्ट डिझायर कारमध्ये गाय व वासराला पळवून नेण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची माहिती गोरक्षक प्रदिप खराडे, गणेश मंजाळ व अक्षय खंडागळे यांना मिळाली. गोरक्षक घटनास्थळी पोहचले. यावेळी वासराची परिस्थिती गंभीर होती. याबाबतीत पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे तसेच मानद पशु कल्याण अधिकारी अभिजीत चव्हाण यांच्यासोबत गोरक्षक प्रदीप खराडे, गणेश मंजाळ व अक्षय खंडागळे यांनी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे यांच्या मार्फत कोणतेही ठोस पाऊल उचलले न गेल्यामुळे बैलाचा दुर्दैवी मृत्यू झाला असे अभिजीत चव्हाण यांनी सांगितले. या आंदोलनामध्ये विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री अभिजीत शिंदे, पशु कल्याण अधिकारी अभिजीत चव्हाण, अमित कुदळे, गणेश मंजाळ, ऋषी ढाकणे, महेश आढाव आदी गोरक्षक उपस्थित होते.

---

# उद्योगांना संकल्प योजनेतून कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल – अरिंदम लाहिरी

## संकल्प योजनेच्या ट्रेनिंग ऑफ ट्रेनरच्या तिसऱ्या बॅचचे इंजिनिअरिंग क्लस्टर येथे उद्धघाटन



**पिंपरी। ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सध्या देशातील उद्योगांत अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती असणाऱ्या चांगल्या प्रशिक्षकांची गरज आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या "संकल्प" योजनेच्या "ट्रेनिंग ऑफ ट्रेनर" प्रकल्पाद्वारे जर्मन निष्णात तज्ज्ञांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हे प्रशिक्षण पूर्ण करणारे प्रशिक्षक पुढील काळात उद्योगांना आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यासाठी प्रयत्न करून उद्योगांची गरज पूर्ण करतील असा विश्वास एएसडिसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरिंदम लाहिरी यांनी व्यक्त केला.**

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालया तर्फे "संकल्प" या योजने अंतर्गत २०० प्रशिक्षणार्थीचा "ट्रैनिंग ऑफ ट्रेनर्स" हा कार्यक्रम चिंचवड येथील पुणे इंजिनीरिंग क्लस्टर येथे सुरु असून या मोफत कार्यक्रमातील तिसऱ्या बॅचचे उद्धघाटन श्री विश्वकर्मा जयंतीचे औचित्य साधून शनिवारी (दि.१७) करण्यात आले.

यावेळी टाटा मोटर्सचे डिजिटल इनिशिएटिव्ह अँड स्पेशल प्रोजेक्ट विभागाचे सर्वना कुमार, इन्स्टिटयूट ऑफ क्वालिटी अँड रिलायबिलिटी इंडियाचे संचालक हेमंत उर्ध्वरेषे, क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे अध्यक्ष सतीश काळोखे, जीआयझेडचे अमर पाटील, इंजिनिअरिंग क्लस्टर पुणेचे संचालक सागर शिंदे, किरण नवाथे, कॅलिस्टस मोझेस, गणेश दिवेकर आदी उपस्थित होते. तर एएसडिसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरिंदम लाहिरी हे ऑनलाइन सहभागी झाले होते. यावेळी क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे अध्यक्ष सतीश काळोखे म्हणाले की, "भारतीय उत्पादनांची गुणवत्ता चांगली असली तरी ग्राहकांचा दृष्टिकोन बदलण्याची आहे. उत्पादन करतानाही आपणही चांगला दृष्टिकोन ठेवला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक उत्पादन मी अधिकाधिक चांगले कसे करू शकतो, हा दृष्टीकोन प्रशिक्षणार्थींनी ठेवला पाहिजे." यावेळी टाटा मोटर्सचे डिजिटल इनिशिएटिव्ह अँड स्पेशल प्रोजेक्ट विभागाचे सर्वना कुमार म्हणाले की,"देशाच्या एकूण सकल उत्पन्नात ऑटोमोबाइल उद्योगाचा वाटा मोठा आहे. या क्षेत्रात निष्णात मनुष्यबळाची गरज आहे. जर हे वेळेत उपलब्ध झाले तर उद्योग, व्यवसाय सक्षम होतील आणि त्यांच्या उत्पादन आणि उत्पन्नात वाढ होऊन देशाच्या विकासासाठी उपयोग होईल. त्यासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण हा कार्यक्रम उपयुक्त आहे."

तज्ञ प्रशिक्षक रामकृष्ण बोराडे व (सीएनसी) बॅचचे प्रशिक्षणार्थी संतोष काटकर, जगदिश नागरगोजे, गणेश मोहोळ, कृष्णा पाटील आधुनिक वेल्डिंग बॅचचे तज्ञ प्रशिक्षक विजय गोरडे प्रशिक्षणार्थी जी. एम. घोलप यांनी मनोगत व्यक्त केले. या अकरा आठवड्याच्या प्रशिक्षणातील सीएनसी प्रोग्रामिंग अँड ऑपरेशन्स, ॲडव्हान्स वेल्डिंग टेकनॉलॉजि, क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर हे कोर्स सध्या सुरु आहेत. .

### प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींना चांगला फायदा

प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींना चांगला फायदा झाला असून सीएनसी प्रोग्रामिंग अँड ऑपरेशन्सची २ री बॅच दि. २४ सप्टेंबर २०२२ पासून सुरु होणार आहे. हे प्रशिक्षण पूर्णतः निःशुल्क असून पशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना १०,०००/- (दहा हजार) रुपये विद्या वेतन आहे. तसेच पुण्याबाहेरील प्रशिक्षणार्थींची मोफत भोजन व निवास व्यवस्था करण्यात येते. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना "ऑटोमोटिव्ह सेक्टर स्किल कौन्सिल" आणि "इंडो जर्मन चेम्बर ऑफ कॉमर्स" अशी दोन प्रमाणपत्र दिली जातात. प्रशिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या किंवा करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी तसेच उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हि सुवर्ण संधी असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन इंजिनीरिंग क्लस्टर पुणेचे संचालक सागर शिंदे यांनी केले आहे.

## संपादकीय »

# तेलाचा तळतळाट!

*रशियाकडील तेलाच्या खरेदीवरील बंदीपेक्षा दरनियंत्रण लादण्याचा ‘जी ७’ समूहाने योजलेला उपाय प्रभावी ठरेल आणि भारतासही लाभाचाच!*

युक्रेन युद्धात रशियास काही प्रमाणात आणि कदाचित तात्पुरतीही माघार घ्यायला लागल्याने पाश्चात्त्य देशांस चांगलाच हुरूप आलेला दिसतो. तसे होणे तसे रास्तच. रशियाच्या या माघारीमागे अमेरिकेने पुरवलेल्या हत्यारांचा वाटा मोठा. यामुळेही असेल पण अमेरिका आणि त्याचे कच्छपि देश रशियाविरोधात आणखी एक अस्त्र उगारू इच्छितात. ते म्हणजे तेलास्त्र! हे आता दुसऱ्यांदा उगारले जाईल. आधी जगाने रशियन तेलावर बहिष्कार घालावा यासाठी प्रयत्न झाले. ते जमले नाही. खुद्द युरोपनेच तसे करण्यास नकार दिला. कारण युरोपातील अनेक देशांतील चुली रशियन ऊर्जास्रोतांवर पेटतात. तेव्हा रशियन इंधनास नाही म्हणणे युरोपियनांस शक्य नाही. त्यामुळे अमेरिकादी देशांनी तेलास्त्राचा दुसरा भाग पुढे केलेला दिसतो. तो म्हणजे रशियन तेलाच्या किमतींवर नियंत्रण. पहिल्या तेलास्त्रापेक्षा हे दुसरे अस्त्र अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता दिसते. याचे कारण यामागे ‘जी ७’ नावाने ओळखला जाणारा बलाढ्य देश समूह असून त्यास संघटनेच्या पातळीवर युरोपचीही मान्यता आहे. म्हणजे अमेरिका, जपान, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, कॅनडा आणि युरोपीय संघटना या दुसऱ्या तेलास्त्रामागे असून हे अस्त्र कधी, कसे आणि किती काळ उगारावे याची चर्चा सध्या सुरू आहे. पहिल्या अस्त्रात रशियाकडून होणारी तेलखरेदी सरसकट बंद करणे अनुस्यूत होते. दुसरे अस्त्र रशियावर किमतीचे नियंत्रण घालते. म्हणजे निर्धारित किमतीपेक्षा अधिक दर घेऊन रशिया तेल विकू शकणार नाही. यामागील विचार असा की किंमत नियंत्रण घातल्याने रशियाचे तेल बाजारात येत राहील, तेलटंचाई होणार नाही आणि तरीही नफेखोरी करता न आल्याने तेल विकून रशियाच्या तिजोरीत फार काही पैसा जमा होणार नाही. या अस्त्राच्या बिनचूकपणासाठी वाहतूक, विमा आदी क्षेत्रे यात सहभागी होतील. ही झाली हे तेलास्त्र उगारणाऱ्यांची पार्श्वभूमी. आता हे अस्त्र ज्यावर उगारले जाणार आहे त्या रशियाविषयी. हा देश आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक. म्हटल्यास सौदी अरेबिया किंवा अमेरिका यांच्याशी स्पर्धा करू शकेल इतके महाकाय तेलसाठे रशियात आहेत. पण तरीही सौदी अरेबिया वा व्हेनेझुएला आदींप्रमाणे रशिया तेल निर्यातदार देशांच्या संघटनेचा सदस्य नाही. प्रतिदिन जगात वापरल्या जाणाऱ्या तेलातील १०-११ टक्के इतका वाटा रशियाच्या तेलाचा असतो. दररोज दहा कोटी बॅरल्स जगात रिचवले जात असेल तर त्यातील एक कोटभर बॅरल्स रशियातील असतात. तथापि युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून इतके तेल विकणे रशियास शक्य झालेले नाही.




# दुर्लक्षित झालेला चातुर्मास

पूर्वी गावागावांतून चातुर्मासात प्रवचने, पोथी -पारायणे,किर्तने होत. शेतात पिके उगवलेली, बाहेर पावसाचे वातावरण,तळी-नद्या भरलेल्या, श्रावण-भाद्रपदाचे सणवार,उपवास व मंदिरातील प्रवचन,त्याचा श्रध्देने घेतलेला आनंद यामुळे थोरामोठ्यांना जगण्याचे बळ मिळे, दुधाच्या सायीप्रमाणे मनावर संयम व धैर्याचा थर जमा व्हायचा, वैर व सूडभावना बोथट व्हायची, नकळत चांगले संस्कार व्हायचे, असा चातुर्मास सामाजिक मनाची,व्यवहारांची सुव्यवस्था करण्यात महत्वाचा हातभार लावीत असे. पुढे आधुनिकतेच्या वावटळीत, औद्योगिक नव्या संरचनेत गावे बदलली. चातुर्मास दुर्लक्षित झाला. लोकांकडे शांततेने काही ऐकण्याची,घेण्याची मानसिकता व वेळ उरला नाही.

# दक्षिणेतून कन्याकुमारीत भारत जोडो’ !






राहुल गांधी यांची ‘भारत जोडो’ दक्षिणेतून कन्याकुमारीत सुरू झाली. ही पदयात्रा आहे. सुमारे ३५७० किमी अंतर चालून राहुल गांधी भारत जोडू इच्छितात. वास्तविक स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपली भारत जोडणी सुरूच आहे. त्यात आता ‘अखंड भारत’ची हाक. म्हणजे; आहे तो भारतच एकजीव करायचा की आसपासचे अन्य देशही त्यात जोडून घ्यायचे याबाबत अद्याप स्पष्टता नाही. ती येईपर्यंत राहुल गांधी यांची ‘भारत जोडो’ पूर्ण झालेली असेल, अशी आशा. साधारण १५० दिवसांत राहुल गांधी हे अंतर पूर्ण करू इच्छितात. म्हणजे प्रतिदिन किमान २४ किमी अंतर त्यांस कापावे लागेल. सर्वसाधारण गतीने चालल्यास निरोगी व्यक्तीस एक किमी अंतर कापण्यास कमाल १५ मिनिटे लागतात. याचा अर्थ एका तासात चार किमी. या गतीने २४ किमी अंतर कापण्यास त्यांना सहा तास लागतील. पण वाटेत जनसामान्यांशी संवाद, सत्कार, जेवणखाण आदीसाठी लागणारा वेळ गृहीत धरावा लागेल. रात्रीचा त्यांचा मुक्काम रस्त्यावरच असणार आहे. अशा तऱ्हेने १२ राज्यांतील इतके अंतर कापून ते फेब्रुवारी महिन्यात जम्मू-काश्मीरची राजधानी श्रीनगर येथे पोहोचतील. साधारण ४२ वर्षांपूर्वी तत्कालीन जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांच्यानंतर अशी समग्र पदयात्रा झालेली नाही. एकेकाळी समाजवादी आणि गांधीवादी खूप चालत. महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, चंद्रशेखर ही अशा पदयात्रींतील महत्त्वाची नावे. नव्वदच्या दशकात लालकृष्ण अडवाणी यांची यात्रा गाजली. पण ती रथयात्रा होती आणि नरेंद्र मोदी, प्रमोद महाजन आदींच्या हाती या रथाची सूत्रे होती. अलीकडची पदयात्रा म्हणजे नव्या पिढीत जगनमोहन रेड्डी यांनी आपल्या आंध्र भूमीत हाती घेतलेली. या यात्रेकरूंस त्या त्या यात्रांचा निश्चित फायदा झाला. वैयक्तिक असो वा राजकीय; चालण्याने आरोग्य सुधारते असा इतिहास आहे.

या ‘ऐतिहासिक’ पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांच्या पदयात्रा संकल्पाचे मूल्यमापन व्हायला हवे. यावर किमान दोन प्रतिक्रिया सहज उमटतील. एक तुच्छतावादी. ‘याने काय साधणार?’ किंवा ‘जोडलेल्यांस पुन्हा काय जोडणार?’ अशी. या प्रतिक्रिया बेदखल केलेल्या बऱ्या. दुसरी प्रतिक्रिया काँग्रेसींची असेल. या यात्रेमुळे आपला दुभंगलेला पक्ष पुन्हा एकसंध होऊन सत्ताधारी भाजपशी दोन हात करण्यास सिद्ध होईल, असे या काँग्रेसींना वाटत असेल. त्याकडेही दुर्लक्ष केलेले बरे. पहिल्या प्रतिक्रियेत जसा सत्यांशाशिवाय विद्वेष भरलेला आहे तसाच दुसऱ्या प्रतिक्रियेत वास्तवापेक्षा आशावादच जास्त आहे. तेव्हा या दोन टोकाच्या भावना दूर ठेवून राहुल गांधी यांच्या या उपक्रमाकडे पाहायला हवे.

# पावसाचा सांगावाः महाराष्ट्र व दक्षिणेकडील काही राज्यांत दमदार पाऊस

**परतीचा पाऊस सुरू होण्याआधीच राज्यातील धरणे तुडुंब भरली ही बातमी तशी आनंद देणारीच.**

देशातील अठरा राज्यांत यंदा तुलनेने पाऊस कमी झालेला असताना विंध्य पर्वताच्या खालचा भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र व दक्षिणेकडील काही राज्यांत झालेला दमदार पाऊस अविश्वसनीय म्हणावा असाच. त्यातल्या त्यात पावसाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केरळमधील पावसाची ‘उणे’ सरासरी लक्षात घेता या भागातील जलसाठ्यात झालेली वाढ समाधान देणारी. आता प्रश्न निर्माण होतो तो पुढील नियोजनाचा. या जलसाठ्याचा वापर आपण कसा करणार? पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी लागणारे पाणी सोडून उर्वरित साठ्याचा वापर नेमका कुठे व कसा केला जाणार? शेतीसाठी त्यातले किती पाणी वापरले जाणार? त्यासंबंधीचे सरकारी पातळीवरचे नेमके नियोजन काय? हा साठा गृहीत धरून राज्याच्या कृषी व जलसंपदा खात्याने एकत्र येऊन कृषी विकासाचा काही कार्यक्रम हाती घेतला आहे का? यासारख्या प्रश्नांचा वेध घेतला तर हाती फारसे काही लागत नाही.



ही आपल्या राज्याची अवस्था.

वातावरण बदलाचा पावसावर झालेला परिणाम, त्याच्या येण्यात आलेली अनियमितता, त्यातून निर्माण होणारी नैसर्गिक संकटे, कुठे ओला तर कुठे कोरडा दुष्काळ, त्यामुळे निर्माण झालेले असंख्य नवे प्रश्न यावरून सारे जग चिंतित असताना यंदा वरुणराजाने केलेली कृपा नियोजनशून्यतेमुळे वाया घालवली जाणार नाही, याची काळजी घेणे हीच सध्याची गरज. राज्यात यंदा उपलब्ध असलेला जलसाठा गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सुमारे २० टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे ऑक्टोबर ते मे या आठ महिन्यांच्या काळासाठी आखले जाणारे पाण्याचे नियोजनसुद्धा त्याच पद्धतीने व्हायला हवे. त्या संदर्भात सरकारी पातळीवर अजून तरी फारशी हालचाल दिसत नाही. पाणी भरपूर उपलब्ध असले की सिंचनावर आधारलेल्या रब्बी हंगामाचे पेरणी क्षेत्र वाढायला हवे. या क्षेत्रात काम करणारे सारेच जाणकार यावर भर देतात. या पार्श्वभूमीवर राज्याची आकडेवारी बघितली तर निराशाच पदरी पडते. राज्याचे खरिपाचे क्षेत्र आहे १४९ लाख हेक्टर तर रब्बीचे अवघे ५४ लाख. या दोन्ही क्षेत्रांत दरवर्षी किंचित वाढ नोंदवली जात असली तरी दोहोंमधला फरक लक्षात घेण्याजोगा. रब्बीसाठी सिंचन व्यवस्था लागते व गेल्या अनेक वर्षांपासून राज्याचे सिंचनाचे गाडे १८ टक्क्यांवरच अडकलेले आहे हे खरे असले तरी निसर्गाने दिलेल्या संधीचा उपयोग करून घ्यायला आपण कधीपासून सुरुवात करणार? खरिपाच्या पिकातून शेतकऱ्याचा खर्च भागतो तर रब्बीचे पीक त्याच्यासाठी नगदीचे म्हणून ओळखले जाते. कृषीवर आधारलेली आपली अर्थव्यवस्था लक्षात घेता रब्बीच्या पीक पद्धतीत बदल करून हा जलसाठा जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

## ।। अभंगवाणी ।।



न ये नेत्रां जळ ।
नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥
तों हे चावटीचे बोल ।
जन रंजवणें फोल ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सातारा हिल हाफ मॅरेथॉनमध्ये धावताना कोल्हापूरच्या युवकाचा मृत्यू

। वाई । महाईन्यूज ।

जागतिक विक्रम नोंदवलेली सातारा हिल हाफ मॅरेथॉनमध्ये देशभरातून तब्बल सात हजार पाचशे स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.या मॅरेथॉनमध्ये धावताना कोल्हापूरच्या ३२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. राजक्रांतीलाल पटेल (रा. मार्केट यार्ड, कोल्हापूर ) असे युवकाचे नाव असून तो खेळाडू म्हणून परिचित होता.

साताऱ्यात आज पहाटे मोठ्या उत्साहात २१.१ किमी यवतेश्वर कास घाटातील मॅरेथॉन स्पर्धेला सुरवात झाली. जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी व पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी ध्वज फडकावून स्पर्धेचे उदघाटन केले. स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी सातारकर नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. औरंगाबादच्या प्रल्हाद घनवट यांनी एक तास नऊ मिनिटात तर म्हसवडच्या रेश्मा केवटे यांनी एक तास चोवीस मिनिटात स्पर्धा पूर्ण करून मागील विक्रम मोडले. मांढरदेवचा कालिदास हिरवे याने एक तास बारा मिनिटात स्पर्धा पूर्ण करून दुसरा क्रमांक पटकावला. तिसरा क्रमांक पटकवलेल्या कोल्हापूरच्या परशुराम भोई यांनी एक तास सतरा मिनिटात स्पर्धा पूर्ण केली.



मॅरेथॉन स्पर्धेला सुरवात झाली. जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी व पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी ध्वज फडकावून स्पर्धेचे उदघाटन केले.स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी सातारकर नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. औरंगाबादच्या प्रल्हाद घनवट यांनी एक तास नऊ मिनिटात तर म्हसवडच्या रेश्मा केवटे यांनी एक तास चोवीस मिनिटात स्पर्धा पूर्ण करून मागील विक्रम मोडले.

# क्षमा करण्यासाठी मोठं मन हवं : एकनाथ शिंदे!

## बंडखोरी केल्यानंतर शिंदे गट आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये उडताहेत खटके

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंमधील वाद दिवसेंदिवस वाढत जाताना दिसत आहे. बंडखोरी केल्यानंतर शिंदे गट आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये खटके उडत आहेत. दोन्ही गटाकडून आरोप-प्रत्यारोप सुरुच आहेत. पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे. " कुणालातरी माफ करणे ही साधी गोष्ट नाही. क्षमा करण्यासाठी मोठं मन हवं", असा टोला त्यांनी उद्धव ठाकरेंना अप्रत्यक्षपणे लगावला आहे. भारतीय जैन महामंडळाचा विश्वमैत्री दिवस कार्यक्रमात त्यांनी हे विधान केलं आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांसह राज्यपाल भगतसिंह कोश्यारीही उपस्थित होते. कष्ट करा काहीही करा पण नशिबाची साथ नसेल तर काहीच होत नाही. पण कष्ट करण्याचं काम आपलं आहे. ते तर करावंच लागेल. नाहीतर नशिबात सगळं आहे. मात्र, कष्ट नाही केले तर काहीच होणार नाही, नुसतं घरी बसून काहीच होत नाही," असं एकनाथ शिंदे म्हणाले. तसेच कुणालातरी माफ करणे ही साधी गोष्ट नाही, त्यासाठी मोठं मन लागतं असा टोलाही शिंदेंनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरेंना लगावला आहे.



### दसरा मेळाव्यावरुन शिवसेना शिंदे गटात रस्सीखेच

दसरा मेळाव्यावरून राजकारण चांगलंच तापलं आहे. दसरा मेळाव्यावरून शिंदे गट आणि शिवसेना आमने-सामने आले आहेत. दोन्ही गटाकडून दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्कची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्यापही यावर तोडगा निघालेला नाही. तर दुसरीकडे आता बीकेसीतील मैदानावर शिंदे गटाचा दसरा मेळावा होणार असल्याची माहिती मिळत आहे. दसरा मेळाव्यासाठी शिंदे गटाचा अर्ज महापालिकेने स्विकारला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शिवसेनेनेही दसरा मेळाव्यासाठी बीकेसीतील मैदानाची मागणी केली होती. मात्र, महापालिकेकडून शिवसेनेचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. शिवाजी पार्कवर यंदा दसरा मेळावा होणार की नाही? झाल्यास कोणाचा होणार हे अद्यापही स्पष्ट होऊ शकलेलं नाही. शिवाजी पार्कबाबत मुंबई महापालिका काय निर्णय घेणार याकडे आता सगळ्यांच लक्ष लागलं आहे.

# 'नीति' आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही संस्था उभारणार!

## महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा निर्णय आम्ही घेऊ- देवेंद्र फडणवीस

। औरंगाबाद । महाईन्यूज ।

**राज्यातील शिंदे -फडणवीस सरकारने आज नीति आयोगाच्या सदस्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार नीति आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही स्वतंत्र अशी संस्था निर्माण केली जाणार असून, इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशन असे या संस्थेचे नाव असणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज(रविवार) मुंबईत माध्यमांनी ही माहिती दिली आहे.**

या संदर्भात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना माहिती देताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की "आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नीति आयोगसोबत एक बैठक झाली. नीति आयोगाचे सीईओ आणि संपूर्ण टीम या बैठकीस हजर होती. मूळातच या बैठकीचं उद्दिष्ट असं होतं की, नीति आयोगाच्या धर्तीवर



महाराष्ट्रात देखील एक इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशन ही तयार करायची. त्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारच्यावतीने आम्ही देखील सादरीकरण केलं. विविध सेक्टरमध्ये कशाप्रकारे मदत होऊ शकते याबाबत नीति आयोगाने देखील सादरीकरण केलं. मुख्यमंत्र्यांनी या गोष्टील तत्वत: संमती दाखवली आहे, की अशा प्रकारची एक संस्था आम्ही महाराष्ट्रात निर्माण करू. लवकरच या संदर्भात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा निर्णय आम्ही घेऊ. ही संस्था कशी असेल, त्या अंतर्गत काय येईल या सर्व बाबी मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर आपल्या पर्यंत पोहचण्यात येतील."

■ मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नीति आयोगसोबत एक बैठक झाली. नीति आयोगाचे सीईओ आणि संपूर्ण टीम या बैठकीस हजर होती. मूळातच या बैठकीचं उद्दिष्ट असं होतं की, नीति आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील एक इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशन ही तयार करायची. त्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारच्यावतीने आम्ही देखील सादरीकरण केलं. विविध सेक्टरमध्ये कशाप्रकारे मदत होऊ शकते याबाबत नीति आयोगाने देखील सादरीकरण केलं. मुख्यमंत्र्यांनी या गोष्टील तत्वत: संमती दाखवली आहे, की अशा प्रकारची एक संस्था आम्ही महाराष्ट्रात निर्माण करू. लवकरच या संदर्भात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा निर्णय आम्ही घेऊ. ही संस्था कशी असेल, त्या अंतर्गत काय येईल या सर्व बाबी मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर आपल्या पर्यंत पोहचण्यात येतील."

याचबरोबर "प्रामुख्याने मॉनिटाइझेन ऑफ ॲसेट्सचा विषय असेल किंवा ब्लॉक चेन इन ॲग्रीक्ल्चर असेल, ईव्ही पॉलीस असेल, अपारंपारिक उर्जेचा वापर अधिक करण्याचे विषय असतील, ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून हेल्थ केअर आणि कृषी क्षेत्र यामध्ये परिवर्तनाचा विषय असेल, असे अनेक विषय चर्चेला आलेले आहेत. या सगळ्या विषयांवर नीति आयोगाने प्रचंड अभ्यास केलेला आहे. नीति आयोगाने एक महत्त्वाचं टूल तयार केलं ज्यामध्ये राज्यातील सर्व विभागात तयार होणारा माहितीसाठा एकत्रित होऊन, त्याचं परीक्षण होऊन त्याच्या आधारावर आपल्याला निर्णय घेता यावेत, अशाप्रकारची व्यवस्था त्यांनी उभी केलेली आहे. ती व्यवस्था राज्यातही उभी करण्यासाठी आम्ही सूतोवाच केलं आहे. ट्रिलियन डॉलर्स इकॉनॉमी या महत्त्वकांक्षी प्रकल्पासंदर्भातही आम्ही नीति आयोगसोबत काम करत आहोत. या सर्व गोष्टी आज चर्चेत आल्या आहेत आणि मुख्यमंत्र्यांनी देखील त्याबाबत सकारात्मक भूमिका घेतलेली आहे.

# कोकणात नाणार रिफायनरी होणारच

## नारायण राणेंची ग्वाही

। मुंबई । महाईन्यूज ।

कोकणात नाणार रिफायनरी होणारच, असे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी म्हटले आहे. वेदान्त प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर नाणार रिफायनरी प्रकल्पही दुसऱ्या राज्यात जाऊ शकतो का? या माध्यमांच्या प्रश्नावर नारायण राणेंनी हे उत्तर दिले आहे. ठरलेल्या ठिकाणीच नाणार रिफायनरी होणार असून या प्रकल्पाला कोणाचाही विरोध चालू देणार नाही, असेही मुंबईत माध्यमांशी बोलताना नारायण राणे म्हणाले आहेत. या संदर्भात काही केंद्रीय नेत्यांच्या संपर्कात असून संबंधित कंपनीसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती राणे यांनी दिली आहे. नाणार येथील तेलशुद्धीकरण प्रकल्प गेली सात वर्षे चर्चेत आहे. या प्रकल्पाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. नाणार येथील प्रस्तावित तेलशुद्धीकरण प्रकल्प पर्यावरण आणि पुनर्वसनाच्या मुद्द्यामुळे बारगळल्यानंतर हा प्रकल्प राजापूर



तालुक्यातच बारसू गाव परिसरात १३ हजार एकरवर उभारण्याचा प्रस्ताव माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या वर्षाच्या सुरवातीला पाठवला होता. या प्रस्तावाबाबतचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. 'रत्नागिरी रिफायनरी ॲण्ड पेट्रोकेमिकल्स लिमिटेड' (आरआरपीसीएल) हा ६० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा प्रकल्प रत्नागिरीतील नाणार येथे होणार होता. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लि., हिंदूस्थान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम या भारतीय कंपन्या आणि सौदी अरामको, अबुधाबी नॅशनल ऑइल कंपनी यांनी त्यासाठी सामंजस्य करार केला होता.

# तैवानमध्ये तिसरा भूकंप!

## रस्त्यांना तडे, ब्रिज कोसळले, जपानमध्ये त्सुनामीचा इशारा

।लखनौ/उन्नाव ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तैवानमध्ये गेल्या २४ तासात तीन वेळा भूकंप आला आहे. भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जपानमध्ये त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. तैवानच्या हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण-पूर्व भागातील तायतुंग काऊंटी भूकंपाचं मुख्य केंद्र आहे, शनिवारी याच भागात ६.४ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला होता. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, रविवारी सकाळी ६.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप जाणवला. यानंतर रविवारी दुपारी ७.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला आहे.**



भूकंपामुळे तैवानमधील अनेक रस्त्यांना तडे गेले आहेत, पूल कोसळले आहेत. युली येथे एक दुकान पडलं असून, चार लोक खाली दबले आहेत. त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पूल कोसळले असल्याने काही वाहनंदेखील खाली कोसळल्याची माहिती मिळत आहे.

डोंगली स्थानरावर ट्रेन रुळावरुन खाली उतरली, स्थानकाचं छतही कोसळलं आहे. युएस पॅसिफिर त्सुनामी वॉर्निंग सेंटरने, या भूकंपानंतर तैवानामध्ये त्सुनामी अलर्ट जारी केला आहे. दुसरीकडे, जपानमध्येही ३.२ फूट उंच लाटांचा त्सुनामी अलर्ट जारी करण्यात आला आहे.

ओकिनावा येथेही भूकंप आला असल्याने हा अलर्ट देण्यात आला आहे.

संपूर्ण तैवानमध्ये भूकंपाचे हादरे जाणवले असून राजधानीत मोठं नुकसान झालं आहे. काही इमारतींना तडे गेले आहेत. ताइनान आणि काओसंग या ठिकाणी भूकंपाचा जास्त प्रभाव दिसल नाही.

### झाडं आणि दगडं डोंगरावरुन कोसळली

संपूर्ण तैवानमध्ये भूकंपाचे हादरे जाणवले असून राजधानीत मोठं नुकसान झालं आहे. काही इमारतींना तडे गेले आहेत. ताइनान आणि काओसंग या ठिकाणी भूकंपाचा जास्त प्रभाव दिसल नाही.


### भौगिलक कारणामुळे येथे सर्वाधिक भूकंप

तैवान रिंग ऑफ फायर परिसरात येतो. भौगिलक कारणामुळे येथे सर्वाधिक भूकंप, त्सुनामी येतात. तसंच ज्वालामुखीचे स्फोट होत असतात. तैवानमध्ये २०१६ मध्ये आलेल्या भूकंपात १०० लोकांचा मृत्यू झाला होता. १९९९ मध्ये आलेल्या ७.३ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपात २००० लोकांना आपला जीव गमवावा लागला होता.

---

### शॉर्ट न्यूज »

### प्रत्यक्ष कर संकलनात २३ टक्क्यांनी वाढ



।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

करोना महासाथी संपल्यानंतर भारताची अर्थव्यवस्था रुळावर येत आहे. उद्योग, सेवा क्षेत्रामध्ये वाढ होताना दिसत आहे. असे असतानाच देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनामध्ये २३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रत्यक्ष कर संकलन दिवसेंदिवस वाढत असून चालू आर्थिक वर्षात हा आकडा ७ लाख कोटींच्या पुढे पोहोचला आहे. याबाबतची माहिती देण्यासाठी केंद्रीय वित्त मंत्रालयाने एक निवेदन जारी केले आहे. भारत सरकारच्या धोरणांमुळे कर संकलनात वाढ होत आहे. तसेच कर आकारणी पद्धतीला आणखी साधे, सरळ आणि सोपे करण्याच्या सरकारचा प्रयत्न आहे. करगळती थांबवण्याठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग केला जात आहे, या सर्व गोष्टींमुळे प्रत्यक्ष कर संकलनात वाढ होण्यास मदत होत आहे, असे केंद्र सरकारच्या निवेदनात म्हणण्यात आले आहे.

---

# श्राद्धाच्या जेवणातून १०० जणांना विषबाधा!

## 50 जणांवर उपचार सुरू, रुग्णांची प्रकृती स्थिर

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

राजस्थानच्या बांसवाडामध्ये अन्नातून विषबाधा झाल्याची मोठी दुर्घटना घडली आहे. पनियाला गावातील एका कुटुंबामध्ये श्राद्धाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमातील मेजवानीतून १०० जणांना विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. यापैकी ५० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एकाचवेळी अचानक रुग्णसंख्या वाढल्याने रुग्णालयात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. ही परिस्थिती रुग्णालय प्रशासनाकडून नियंत्रणात आणण्यात आली. दरम्यान, रुग्णालयात पोलीस दाखल झाले असून घटनेचा तपास करण्यात येत आहे. बांसवाडाच्या पनियाला या गावात श्राद्धाच्या कार्यक्रमात २०० जणांनी हजेरी लावली होती. या कार्यक्रमातील मेजवानीदरम्यान अचानक काही जणांना अस्वस्थ वाटू लागले. उलट्या आणि जुलाबाच्या तक्रारीनंतर या लोकांना तात्काळ बांसवाडामधील महात्मा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते.



महात्मा गांधी रुग्णालयात रात्री उशिरापर्यंत रुग्णांना उपचारासाठी ग्रामस्थांकडून दाखल करण्यात येत होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता रुग्णालय परिसरात अतिरिक्त पोलीस दल तैनात करण्यात आले होते. रुग्णांवर सध्या उपचार सुरू असून त्यांची प्रकृती सुधारत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.


---

# आम आदमी पार्टी छोट्या 'कान्हा' सारखी आहे, दहा वर्षांपासून राक्षसांना मारत आहे

।नवी दिल्ली
। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

"आम आदमी पार्टीही लहान कान्हा सारखी आहे. ज्याप्रमाणे कान्हाने लहानपणी मोठ्या-मोठ्या राक्षसांना मारले होते, त्याचप्रमाणे एक छोटाशी "आम आदमी पार्टी" देशातील मोठ्या शक्तींशी लढत आहे." असं विधान आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज (रविवार) लोकप्रतिनिधींच्या परिषदेत बोलताना केले.

त्याचबरोबर ते म्हणाले की, "जे लाल किल्ल्यावरून म्हणतात की मी भ्रष्टाचाराशी लढत आहे, ते आम आदमी पार्टीबरोबर भ्रष्टाचाराशी लढत नाहीत." अरविंद केजरीवाल म्हणाले की, "जगाच्या इतिहासात एवढ्या वेगाने कोणताही पक्ष वाढला नाही. एक दहा वर्षांचा पक्ष आहे आणि समोर एवढे बलाढ्या जुने पक्ष आहेत. आपण



ऐकलं आहे की, भगवान श्रीकृष्ण यांना त्यांच्या लहानपणी कान्हा म्हटलं जायचं. आपल्या लहानपणी कान्हानी अनेक शक्तिशाली राक्षसांचा वध केला होता. ही आम आदमी पार्टीदेखील छोटीशी पार्टी आहे आणि कान्हा सारखीच आहे. आपल्या समोरील बलाढ्या राक्षसांचा वध करत आहे.वध म्हणजे कुणाचा खून करत नाही. तर भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाईचा वध करत आहे. ज्या प्रमाणे भगवान श्रीकृष्णाने लहानपणी कमी वयात मोठ्या राक्षसांचा वध केला होता. त्याचप्रमाणे केवळ दहा वर्ष जुनी आम आदमी पार्टी समोरील शक्तींसोबत लढत आहे." असं केजरीवाल यांनी म्हटलं आहे.

# ती मी नव्हेच' चित्रपटात उर्मिला मातोंडकर आणि श्रेयस तळपदे एकत्र झळकणार



बुधवारी मुंबईत संपन्न झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात मराठीतील दिग्गज कलाकार-तंत्रज्ञांच्या साक्षीनं सात चित्रपटांची अधिकृत घोषणा करण्यात आली. मनोज अवाना या चित्रपटांचे सहनिर्माते असून, सेजल पेंटर आणि मंगेश रामचंद्र जगताप ऑनलाइन निर्माते आहेत. या चित्रपटांच्या यादीतील 'ती मी नव्हेच' या महत्त्वपूर्ण चित्रपटानं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

परितोष पेंटर यांनी लिहिलेल्या 'ती मी नव्हेच' या चित्रपटात श्रेयस तळपदे, उर्मिला मातोंडकर आणि निनाद कामत हे हिंदी कलाविश्वातील नामवंत कलाकार प्रथमच मराठीमध्ये एकत्र काम करताना दिसणार आहेत. जुन्या आठवणींमध्ये रमलेल्या श्रेयस तळपदेनं दिलखुलासपणे संवाद साधला. श्रेयस म्हणाला की, त्या काळी 'रंगीला'मधील 'या ही रे...' या गाण्यातील उर्मिलाच्या रुपानं सर्वांना घायाळ केलं होतं. त्याच उर्मिलासोबत कधी काळी स्क्रीन शेअर करायला मिळेल असं वाटलं नव्हतं. परितोषनं ही किमया साधली आहे. योगायोग म्हणजे आम्ही दोघेही मिठीबाई कॅालेजचे विद्यार्थी आहोत. उर्मिलासोबत काम करण्याची संधी मिळाल्यान खूप आनंदी आहे. 'ती मी नव्हेच' हा एक वेगळ्या धाटणीचा चित्रपट असल्याचही श्रेयस म्हणाला.

# राजामौलींच्या चित्रपटात आलिया भट्टची वर्णी



एस.एस. राजामौली यांनी या चित्रपटाला 'ग्लोबट्रोटिंग ॲक्शनर' अशी उपमा दिली आहे.

आलिया भट्ट सध्या बॉलिवूडमधली टॉपची अभिनेत्री आहे. २०२२ वर्ष तिच्यासाठी फार लकी ठरले आहे. या वर्षात तिचे 'गंगुबाई काठियावाडी', 'आरआरआर', 'डार्लिंग्ज' आणि 'ब्रह्मास्त्र' असे सुपरहिट चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. एका वर्षात १०० कोटींची कमाई करणाऱ्या ३ चित्रपटांमध्ये काम करणारी ती पहिली अभिनेत्री आहे. याच वर्षी एप्रिल महिन्यामध्ये तिने रणबीर कपूरशी लग्न केले. आलिया गरोदर आहे. तिच्या चाहत्यांसाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी आलिया भट्टचा बहुचर्चित 'ब्रह्मास्त्र' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. प्रदर्शनानंतर चित्रपटाला संमिश्र प्रतिसाद मिळाला. तरीही या चित्रपटाने आतापर्यंत बॉक्स ऑफिसवर ३०० कोटींपेक्षा जास्त रुपयांचे कलेक्शन केले आहे. नकारात्मक प्रतिक्रियांबद्दल ती म्हणाली की, "आम्ही सध्या नकारात्मक मतांपेक्षा सकारात्मक गोष्टींकडे पाहत आहोत. चित्रपटामध्ये सकारात्मक गोष्टी नसत्या, तर त्याचा परिणाम चित्रपटाच्या कलेक्शनवर नक्कीच झाला असता." आलियाने 'आरआरआर'मध्ये छोटीशी व्यक्तिरेखा साकारली होती. ती एस.एस.राजामौलींच्या आगामी चित्रपटामध्ये महेश बाबूसह दिसणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे चित्रपट समीक्षक 'उमेर संधू' यांनी ट्वीट करत ही माहिती दिली आहे. या ट्वीटमध्ये ते लिहितात, "एस.एस.राजामौलींच्या आगामी 'एसएसएमबी29' (SSMB29) या चित्रपटामध्ये आलिया भट्ट व महेश बाबू एकत्र काम करणार आहेत. चित्रपटाचे चित्रीकरण आलियाच्या बाळाच्या जन्मानंतर सुरु होईल." दरम्यान टोरंटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये राजामौलींनी या चित्रपटाची घोषणा केली होती. या चित्रपटाला त्यांनी 'ग्लोबट्रोटिंग ॲक्शनर' (GLOBETROTTING ADVENTURE) अशी उपमा दिली आहे.

# कृती सेननला आवडतो प्रभास?

टॉलिवूड अभिनेता प्रभास आणि बॉलिवूड अभिनेत्री कृति सेनन सध्या त्यांच्या 'आदिपुरूष' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहेत. याचं दरम्यान, कृति सेनन आणि प्रभास हे दोघेही एकमेकांना डेट करत असल्याच्या जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. मागील काही दिवसांपूर्वी जेव्हा कृति सेनन, करण जौहरच्या 'कॉफी विथ करण 7'मध्ये सहभागी झाली होती त्यावेळी एक खेळ खेळताना कृति सेननने सर्वात आधी फोन प्रभासला लावला होता. त्यानंतर दोघांमध्ये काही बोलणं झालं. तेव्हापासून या दोघांचे अफेयर चालू असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार, कृति सेनन आणि प्रभास दोघेही एकमेकांशी सेटवर लवकर जोडले गेले आहेत. दोघेही सेटवर एकमेकांसोबत जास्त वेळ एकत्र घालवणं पसंत करतात. तसेच शूट संपल्यानंतर देखील दोघे फोन कॉल्स आणि मॅसेजद्वारे संपर्कात असतात. ज्यातून सिद्ध होतं की, दोघं एकमेकांशी जास्तच कनेक्ट झाले आहेत.



# हे व्हीएफएक्स नाही हा खराखुरा..

प्राणी बघायला मिळतात. वाढत्या शहरीकरणामुळे जंगले नाहीशी होताना दिसून येत आहेत. कालच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय वन उद्यानातं सकाळी ११.३० च्या सुमारास लीव्हर खेचून तीन चित्ते उद्यानात सोडले. १९५२ मध्ये चित्ता भारतातून नामशेष झाले होते. आता पुन्हा एकदा भारतात चित्ते दिसणार आहेत. आजवर बॉलिवूडमध्ये वाघ, सिंह असे प्राणी चित्रपटांमध्ये दाखवले गेले आहेत. मात्र चित्ता हा प्राणी कधी दिसण्यात आला नाही. बॉलिवूडमधील एका अभिनेत्रीने मात्र खऱ्याखुऱ्या चित्त्यासोबतचा फोटो शेअर केला होता.

अभिनेत्री करिष्मा कपूर गेली अनेक वर्ष सिनेसृष्टीत कार्यरत आहे. दोन वर्षांपूर्वी करिष्माने चित्यासोबतचा फोटो शेअर केला होता. या फोटोमध्ये चित्ता गाडीच्या बोनेटवर उभा आहे तर करिष्मा कपूर घाबरलेली दिसत आहे. तिने या फोटोला कॅप्शन दिला आहे की, 'या फोटोत कोणतेही व्हीएफएक्स नाही अथवा कॉम्पुटरने एडिट केलेले नाही. या फोटोत मी एका सुंदर चित्यासोबत आहे. अर्थात मी घाबरलेले होतेच. हा चित्रपट ओळखा बरं? अशा शब्दात तिने कॅप्शन लिहला आहे. चाहत्यांनी कंमेंट्समधून या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे'. करिश्माने शेअर केलेला फोटो हा २००० साली आलेल्या शिकारी चित्रपटातील आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण दक्षिण आफ्रिकेत करण्यात आले होते. या चित्रपटात तिच्याबरोबर गोविंदा,तब्बू हे कलाकारदेखील होते. 'राजा हिंदुस्तानी', 'दिल तो पागल हैं' सारखे एकाहून एक सरस हिट चित्रपट करिष्मा कपूरने दिले आहेत. करिष्मा कपूरचे आई वडीलदेखील अभिनय क्षेत्रात कार्यरत होते. करिश्मा कपूरचं याआधी दिल्लीतील व्यावसायिक संजय कपूर याच्याशी २००३ मध्ये लग्न झालं होतं. या लग्नापासून तिला मुलगी समायरा आणि मुलगा कियान अशी दोन मुलं आहेत. २०१४ मध्ये या दोघांचं नातं संपल्याचं जाहीर झालं आणि २०१६ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. करिश्मा कपूरने आमिर खान, सलमान खान आणि शाहरुख खान यांसारख्या दिग्गज कलाकारांबरोबर काम



## शॉर्ट न्यूज »

### विराट मोहालीत पोहचताच अनुष्का शर्माची भावनिक पोस्ट



**बेलग्रेड । महाईन्यूज**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन टी२० मालिकेला २० सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना मोहालीत होणार आहे. या सामन्यासाठी भारत आणि ऑस्ट्रेलियाचे दोन्ही संघ मोहालीत पोहोचले आहेत. या सामन्यासाठी विराट कोहलीही मोहालीला पोहोचला आहे. दरम्यान, त्याची पत्नी आणि बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्माने इंस्टाग्रामवर एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे आणि त्यात ती सांगते की, "तुझ्या सोबत राहून हे जग खूप सुंदर वाटते." दरम्यान, पत्नी अनुष्का शर्माला त्याच्या आठवणीने पछाडले आहे. तिने इंस्टाग्रामवर विराटसोबतचा फोटोसह एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. अनुष्काने तिच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये म्हटले आहे की, " या माणसासोबत जेव्हा मी असते तेव्हा मला हे जग अधिक सुंदर वाटते.

# ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेआधी भारताला मोठा धक्का

## कोविड संसर्गामुळे महत्त्वाचा खेळाडू बाहेर

**।डर्बी । महाईन्यूज ।**

२० सप्टेंबरपासून मोहाली येथे भारत विरुद्ध ऑस्ट्रेलियाची तीन सामन्यांची टी-२० मालिका सुरू होणार आहे. ही मालिका सुरू होण्यापूर्वी भारतीय संघातून एक महत्त्वाचा खेळाडू बाहेर झाला आहे. भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला करोना विषाणूचा संसर्ग झाल्याने तो आगामी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत खेळू शकणार नाही. मागील अनेक दिवसांपासून तो संघाबाहेर होता. पण आता करोना संसर्ग झाल्याने त्याचं पुनरागमन पुन्हा एकदा लांबणीवर पडलं आहे. मोहम्मद शमीच्या जागी आता भारताचा अनुभवी वेगवान गोलदांज उमेश यादवला संघात संधी मिळणार आहे. उमेश यादवही दोन वर्षानंतर संघात पुनरागमन करणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये उमेश यादव ऑस्ट्रेलियाविरुद्ध सात टी-२० सामन्यांच्या मालिकेत खेळला होता. दरम्यान, त्याला दुखापत झाल्याने मागील दोन वर्षापासून तो संघाबाहेर होता. अखेर दोन वर्षानंतर उमेश यादव पुनरागमन करणार आहे. याबाबतची अधिक माहिती देताना बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितलं की, होय, मोहम्मद शमीची कोविड-१९ ची चाचणी पॉझिटिव्ह आली आहे. पण करोना संसर्गाची लक्षणं सौम्य असल्याने काळजी करण्यासारखे काही नाही. मात्र, करोना संसर्गामुळे त्याला विलगीकरणात राहावं लागणार आहे. त्याची करोना चाचणी निगेटिव्ह आल्यावर तो पुन्हा संघात पुनरागमन करू शकेल. मोहम्मद शमी दक्षिण आफ्रिकेविरुद्धची टी-२० मालिका सुरू होण्यापूर्वी संघात परतण्याची शक्यता आहे.



मोहम्मद शमीच्या जागी आता भारताचा अनुभवी वेगवान गोलदांज उमेश यादवला संघात संधी मिळणार आहे. उमेश यादवही दोन वर्षानंतर संघात पुनरागमन करणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये उमेश यादव ऑस्ट्रेलियाविरुद्ध सात टी-२० सामन्यांच्या मालिकेत खेळला होता. दरम्यान, त्याला दुखापत झाल्याने मागील दोन वर्षापासून तो संघाबाहेर होता. अखेर दोन वर्षानंतर उमेश यादव पुनरागमन करणार आहे. याबाबतची अधिक माहिती देताना बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितलं

# झुलन गोस्वामीच्या कामगिरीवर लक्ष!

## भारतीय महिला संघाचा इंग्लंडविरुद्ध पहिला एकदिवसीय सामना

**।पीटीआय, । महाईन्यूज ।**

ट्वेन्टी-२० मालिकेत निराशाजनक कामगिरी करणाऱ्या भारतीय महिला संघाचे इंग्लंडविरुद्ध रविवारपासून सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेत खेळ उंचावण्याचे ध्येय आहे. भारताची अनुभवी वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामीची ही कारकीर्दीतील अखेरची मालिका असल्याने तिच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष असेल. कर्णधार हेदर नाईटसह इंग्लंडच्या तीन प्रमुख खेळाडूंना ट्वेन्टी-२० मालिकेला मुकावे लागले. त्यामुळे भारतीय संघाला इंग्लंडमध्ये मालिका जिंकण्याची नामी संधी मिळाली होती. मात्र, बहुतांश फलंदाजांचे अपयश आणि क्षेत्ररक्षणातील चुका यामुळे भारताने ट्वेन्टी-२० मालिका १-२ अशा फरकाने गमावली. आता एकदिवसीय मालिकेत कामगिरीत सुधारणा करण्याचा भारतीय संघाचा मानस असेल. भारतीय संघाच्या फलंदाजीची भिस्त पुन्हा सलामीवीर स्मृती मानधना आणि कर्णधार हरमनप्रीत कौर या अनुभवी जोडीवर



असेल. त्यांना शफाली वर्मा, यास्तिका भाटिया यांची साथ मिळणे गरजेचे आहे. ट्वेन्टी-२० मालिकेत भारताच्या मधल्या फळीला चांगली कामगिरी करता आली नाही. भारताला मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्जची उणीव भासली. एकदिवसीय मालिकेसाठी जेमिमाचा भारतीय संघात समावेश असला, तरी तिच्या तंदुरुस्तीवर प्रश्नचिन्ह आहेत. अनुभवी दीप्ती शर्मा, स्नेह राणा आणि पूजा वस्त्रकार यांचे अष्टपैलू योगदान भारतासाठी महत्त्वाचे ठरेल. गोलंदाजीत ३९ वर्षीय झुलनचा दमदार कामगिरीचा प्रयत्न असेल. इंग्लंडच्या काही प्रमुख खेळाडू एकदिवसीय मालिकेलाही मुकणार आहेत. त्यामुळे २०१ एकदिवसीय सामन्यांत २५२ बळी मिळवणाऱ्या झुलनविरुद्ध धावा करणे इंग्लंडच्या युवा फलंदाजांना आव्हानात्मक ठरू शकेल.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..

महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही